# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ९/२/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४१** **विषय क्रमांक- ५४१**
**दिनांक – ९/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४१ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. जावक क्र.डक्षे/स्था/कावि/१४८/२०२४ दि.०५/२/२०२४ अन्वये, सन २०२३-२०२४ च्या मुळ अंदाजपत्रकात "विशेष योजना" या लेखाशिर्षाअंतर्गत "प्रभाग क्र.२५ वाकड येथील आरक्षण क्र.४/२३ मध्ये शाळेचे ग्राऊंड डेव्हलपमेंट, फर्निचरची व आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे" या नविन कामाचा समावेश करून प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४१ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. जावक क्र.डक्षे/स्था/कावि/१४८/२०२४ दि.०५/२/२०२४ अन्वये, + पाच मजले करणेचा समावेश आहे. सदर इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १४४७८ चौ.मीटर इतके असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे, अ) तळमजला २७१५ चौ.मीटर, ब) पहिला मजला २२५० चौ.मीटर, क) दुसरा ते पाचवा मजला प्रत्येकी २३७८ चौ.मीटर इतके आहे. सदरच्या कामामध्ये आर.सी.सी. काम ९५ टक्के पुर्ण झाले आहे. तसेच तळमजल्यापासून चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम प्लास्टरचे काम पुर्ण झालेले असून पाचव्या मजल्याचे बांधकाम प्लास्टरचे काम चालू आहे व इमारतीमधील उर्वरीत कामे (टाईल्स बसविणे, ग्रील बसविणे, इत्यादी कामे) बरोबरीने सुरू आहेत. तरी सदर इमारतीची कामे जुन २०२४ अखेर पुर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच सदरची शाळा सन २०२४-२५ या शैक्षणीक वर्षात सुरू करणेचे नियोजन आहे. त्याअनुषंगाने शाळेचे ग्राऊंड डेव्हलपमेंट, सिमाभिंत, फर्निचर, इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून या कामाचे प्रकल्प सल्लागार मे.नियोजन कंन्सलटंन्ट यांनी राज्यस्तरीय दरसुची सन २०२३-२०२४ व मंजूर दरपृथ्थकरण नुसार सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक (Detailed Estimate) तयार केलेले आहे. त्याची अंदाजपत्रकीय र.रू.२४,५०,००,०००/- (अक्षरी र.रू. चोवीस कोटी पंन्नास लाख फक्त) इतकी येत आहे. सदरची शाळा लवकरात लवकर सुरू झाल्यास परिसरातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदाच होऊन त्याची मनपाच्या नावलौकिकात भर पडणार आहे. त्यामुळे सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाचा सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षकाअंतर्गत समावेश करून त्यास र.रू.२४,५०,००,०००/- इतक्या रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४२** **विषय क्रमांक- ५४२**
**दिनांक – ९/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४२ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१०/३२/२०२४ दि.०६/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी या गावाच्या मंजूर विकास योजनेमध्ये नगर रचना योजना राबविणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४२ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१०/३२/२०२४ दि.०६/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील वाढीव हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी, ता.हवेली जि.पुणे येथे नकाशात गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविलेल्या क्षेत्रासाठी नगर रचना योजना तयार करण्याचे योजिले आहे. नमूद केलेल्या गावातील क्षेत्रासाठी नगर रचना योजना ( T. P. Schemes) राबविण्यास व नगर रचना योजना राबविण्याचे निश्चित होणा-या क्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास उदा. नगर रचना योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करणे,प्रारुप नगर रचना योजना मा. संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सल्लामसलतीने तयार करुन प्रसिध्द करणे, हरकती/ सुचनांचा विचार करणेस तदनंतर प्रारुप नगर रचना योजना शासनास मान्यतेसाठी सादर करणे इत्यादी प्रक्रिया करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मंजूरीकामी” मान्यता मिळणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४३** **विषय क्रमांक- ५४३**
**दिनांक – ९/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४३ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/६२/२०२४ दि.०९/२/२०२४ अन्वये, विकास योजना- पिंपरी चिंचवड मौजे चऱ्होली येथील सर्व्हे क्र. ३१७(जुना ३४७), सर्व्हे क्र. ३१८(जुना ३५२) या जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत . |
| **ठराव क्र. ५४३ दिनांक - ९/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/६२/२०२४ दि.०९/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस –१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ अन्वये मंजूर झालेली असून अधिसूचना क्र. टीपीएस/१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/ पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३, |

| | |
|---|---|
| | दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चऱ्होली येथील स.नं. ३१७ (जुना स.नं. ३४७) व स.नं. ३१८ (जुना स.नं. ३५२) ही जमिन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर विकास आराखड्यामध्ये शेती विभागामध्ये समाविष्ट आहे. सदरची जमिन ही विकास आराखड्यामधील रहिवास विभागालगत आहे. चऱ्होली येथील स.नं. ३१७ (जुना स.नं. ३४७) व स.नं. ३१८ (जुना स.नं. ३५२) ही जमिन शेती विभागमधून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त जमिन शेती विभागामधुन रहीवास विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणेस मान्यता देणेकामी व यासंबंधी हरकती/सुचना मागविणे व त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**